साप्ताहिक
# प्रगत भारत
Web:www.pragatbharat.com,youtube-pragatbhart,Em-pragagatbhart@gmail.com,mo.9860877789

● वर्ष:१८ ● अंक क्र. ४५ ● साप्ताहिक ● मंगळवार दि. ९ ते १५ जून २०२६ ● RNI/MAH/MRA/2008/25149 ● RNP/पोस्ट- PCE/006/2024-2026 ● पृष्ठे-४ ● किंमत:२.००

**सा.प्रगत भारत**
वृत्तपत्रकाचे आजच सभासद व्हा व घरपोच अंक मिळवा वार्षिक ५००/-रू दोन वर्षे-१०००/-रूपये अधिक माहिती वसंपर्क-९८६०८७७७८९दररोजच्या ताज्या बातम्या पहा.. खालील वेब पोटर्स न्युज ..www.pragatbhart.com




## तुकाराम मुंडे यांना विधान परिषद निवडणुकीची जबाबदारी द्यावी!
## लेखक-इंजि.चंद्रप्रकाश देगलूरकर



**मायबाप सरकारने २१ वर्षात २५ बदल्या केल्या, आता आणखी एक बदली निवडणूक आयोगात करुन मा.तुकाराम मुंडे यांच्यावर विधान परिषदेच्या निवडणुकीची जबाबदारी देण्यात यावी,म्हणजे कांही प्रमाणात का होईना या छोट्याशा निवडणुकीतील घोडेबाजारास निश्चितपणे आळा बसेल!** २१ वर्षात २५ बदल्या हा आकडा म्हणजे तुकाराम मुंडे साहेबांच्या प्रामाणिकपणाचा आणि भ्रष्ट महाराष्ट्र सरकारच्या काळया प्रशासनाचा पुरावा आहे. जिथे जिथे मुंडे साहेबांची बदली झाली त्या त्या विभागाची त्यांनी निडर होऊन बिनधास्तपणे पो-लखोल केली म्हणून ‘‘प्रामाणिक‘‘ राज्यकर्ते त्यांची सतत बदली करीत असतात. स्वतःआमदार म्हणून निवडून येण्यासाठी हे राज्यकर्ते वर्षानुवर्षे एकाच मतदार संघात तळ ठोकणार व पुन्हा पुन्हा तिथेच निवडणूक लढवणार, स्वतःथकले की बायको,पोरगा,पोरगी आणि नंतर मग भाऊ,भावजय,पुतण्या असा क्रम असतो(यालाच ते लोकशाही म्हणत असतात..)पण अधिकाऱ्यांना मात्र एका ठिकाणी राहून चांगले काम ते करु देणार नाहीत.

जनआक्रोशाच्या गोंडस बहाण्या खाली आपल्या बगलबच्यांना खुश करण्यासाठी ते प्रामाणिक अधिकाऱ्यांचे वारंवार बळी देत असतात.जनता बिचारी विसरभोळी असते.राज्यात सध्या विधान परिषदेच्या निवडणुका होऊ घातलेल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थेचे नगरसेवक आदी मतदार हे दात घासून बसले असतील. कोणाकडून किती चाय नाष्टा मिळतो याची बहुदा ते वाट पाहत असावेत.एखादा भोजन देणारा भेटला तर मग चांग भले झाले..! तसे तगडे उमेदवार राजकीय पक्षांनी निवडलेले असतात.जिल्हाधिकारी महोदय आदर्श आचारसंहिता वगैरे बाबी प्रामाणिकपणे पाहत असतात व तशा बैठका ते वारंवार घेत असतात. सबकुछ आलबेल है असे दाखविण्याचा तो प्रामाणिक प्रयत्न असू शकतो.एखाद्या लोकहिताच्या प्रश्नावर अशा तातडीच्या बैठका वगैरे होत नसतात बरे (हिच तर खरी लोकशाही असावी!) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे सारे नियम पायदळी तुडवून विधान परिषदेच्या निवडणुकीचा घोडेबाजार बहरुन येत असतो.पाच पन्नास रुपयांची एखाद्या कर्मचाऱ्याने लाच मागितली तर त्याला जेरीस आणण्यासाठी मोठ मोठे प्रामाणिक सापळे रचले जात असतात आणि विधान परिषद निवडणुकीत लाखो करोडोची उलाढाल होत असताना राज्यातील लाच लुचपत प्रतिबंधक विभाग मात्र गाढ झोपलेले असते. त्यांना कुणी तरी तक्रार दिली तरच ते सापळा वगैरे रचतात म्हणे ! आता इथे तक्रार कोण देणार ? शास-नानेच पुढाकार घेऊन कांही ठोस उपाययोजना केल्या तरच विधान परिषदेच्या निवडणुकीत होणारा घोडेबाजार थांबू शकतो. पैशाच्या या प्रचंड उलाढालीमुळे सर्वसामान्य कार्यकर्ता प्रामाणिक असूनही या निवडणुकीत उभे राहण्याची हिंमत करु शकत नाही, म्हणून तर निष्ठावंतांना डावलून पैसेवाल्यांना तिकीट देऊन भ्रष्टाचाराला प्रोत्साहन देण्यात येत आहे, यालाच आपण लोकशाही समजण्याची घोडचूक करीत आहोत ! विधान परिषदेच्या निवडणुकीतील घोडेबाजाराला खरेच आळा घालावा असे जर कुणाला प्रामाणिकपणे वाटत असेल तर यासाठी सर्व संभाव्य उमेदवार आणि मतदार यांचे निवडणुकीपूर्वीचे आणि नंतरचे बँक खाते तपासले किंवा त्यांच्या प्रत्येक व्यवहारावर पाळत ठेवली तर भ्रष्टाचार उघडकीस येऊ शकतो. कालपर्यंत कफल्लक असलेला हा ‘‘मतदार‘‘ एकदम रातोरात लखपती कसा काय होतो ? या काळात त्याने केलेली देवाण घेवाण आणि त्याचे बाजारातील व्यवहार तपासले तरी बरेच पितळ उघडे पडू शकते पण हे करणार कोण ? मांजराच्या गळ्यात घंटा बांधणार कोण?नांदेडचे जिल्हाधिकारी महोदय असा धाडसीपणा दाखवू शकतील काय? शिवराज मोटेगावकर याची आर सी सी कोचिंग क्लासेसची इमारत पाडण्याची हिंमत अजून कुणी दाखविली नाही तर विधान परिषदेच्या भावी आमदारांना चाप कोण लावणार? आहे का कुणी सिंघम?मा.तुकाराम मुंडे,आय ए एस यांनी अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्त पदावर नियुक्ती झाल्यानंतर फक्त ७ दिवसांत ७५ पेक्षा जास्त कारवाया केल्या,५३ धाडी टाकल्या आणि ३३ दोषींना अटक केली ! हा तर फक्त ‘ओपनिंग स्पेल’ आहे, खरी मॅच तर अजून बाकी आहे ! अशी मॅच अन्य कुणी आय ए एस खेळतील काय ? फक्त चित्रपटातील हिरो आणि तुकाराम मुंडे हेच असा करिष्मा करु शकतील.हिरो असलेले विजय थलपती आता तामिळनाडूचे मुख्यमंत्री झाले आहेत,त्यांच्या राज्यात विधान परिषदेच्या निवडणुका कशा पार पडतात,हे पाहणे देखिल खूप मजेशीर ठरेल!-

**इंजि.चंद्रप्रकाश देगलूरकर-**

## आळंदीत माऊलींच्या दानपेटीतून रोकड लंपास,सेवेकऱ्यावर गुन्हा दाखल;संस्थानच्या कारभारावर प्रश्नचिन्ह?




**आळंदी:-**संत ज्ञानेश्वर महाराज समाधी मंदिरातील दानपेटीतून सेवेकऱ्यानेच रोकड लंपास केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी विशाल बाळू वारूळे या सेवेकऱ्यावर आळंदी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर वीर यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १२, १३ आणि १६ मे २०२६ रोजी सायंकाळच्या वेळी दानपेटीतील रक्कम कॅशियरकडे जमा करण्याची जबाबदारी संबंधित सेवेकऱ्यावर होती.दानपेटीतील पैसे बकेटमध्ये भरत असताना आरोपीने संधी साधत नजर चुकवून रोकड स्वतः च्या पिशवीत टाकल्याचे समोर आले आहे.तीन दिवसांत एकूण १५ हजार रुपयांची रोकड लंपास करण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले.आणखी शोधा सीसीटीव्ही फुटेज आणि अंतर्गत चौकशीतून हा प्रकार उघडकीस आल्यानंतर संस्थान प्रशासनाने पोलिसांकडे तक्रार दाखल केली.

घटनेनंतर भाविकांमध्ये संतापाचे वातावरण असून, मंदिरातील सुरक्षाव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.दरम्यान, समाधी मंदिर परिसरात यापूर्वीही पैसे चोरीच्या घटना घडल्याची चर्चा असून, प्रशासनाने कठोर पावले उचलली नसल्याची नाराजी नागरिक व्यक्त करत आहेत. दानपेट्यांची मोजणी प्रक्रिया, सीसीटीव्ही देखरेख आणि कर्मचाऱ्यांवरील नियंत्रण यामध्ये गंभीर त्रुटी असल्याचा आरोपही केला जात आहे.या प्रकरणामुळे ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीच्या पारदर्शक कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून,आळंदी पोलिस पुढील तपास करत आहेत.




## अडचणीत काँग्रेसचा कार्यकर्ता सोबत आहे-सतेज पाटील
## काँग्रेस पिं.चिं.शहराध्यक्ष नरेंद्र बनसोडे यांचा पदग्रहण सोहळा संपन्न




**पिंपरी येथे काँग्रेसचे आमदार सतेज पाटील यांच्या हस्ते काँग्रेसचा ध्वज पिं. चिं.नवनिर्वाचित शहराध्यक्ष नरेंद्र बनसोडे यांच्याकडे सोपवण्यात आला आणि तो स्वीकारात त्यांनी त्यांचा पदभार स्वीकारला.**

**पिंपरी:-विरोधक विकास डोळ्यापुढे न ठेवता इतर सर्वच मुद्द्यांकडे दिशाभूल करत निवडणूक लढवत आहेत.मात्र काश्मीर पासून कन्याकुमारी पर्यंत काँग्रेसचा कार्यकर्ता हा नागरिकांच्या सोबत अडचणीत उभा आहे हा विश्वास देत पुढे जाणे गरजेचे आहे.असे मत आमदार सतेज पाटील यांनी येथे सांगितले.**

काँग्रेसचे नेते आमदार सतेज पाटील यांच्या हस्ते काँग्रेसचा ध्वज पिंपरी चिंचवडचे नवनिर्वाचित शहराध्यक्ष नरेंद्र बनसोडे यांच्याकडे सोपवण्यात आला आणि तो स्वीकारात त्यांनी त्यांचा पदभार स्वीकारला.पदग्रहण करताच पक्षातील काँग्रेस पक्षाचा विचार आणि वारसा जपणाऱ्या सर्व ज्येष्ठ नेत्यांचा सन्मान कार्यक्रमाचे मुख्य मार्गदर्शक बंटी उर्फे सतेज पाटील यांच्या हस्ते करण्यात आला. काँग्रेस पक्षाचा पिंपरी चिंचवड शहराचा लोगो, एस आय आर मतदार यादी पुनर्परीक्षण अभियानाच्या माहिती मदत क्रमांकाचे उदधाटन,पिंपरी चिं-चवड काँग्रेसची वेबसाईटचे उदघाटन सतेज उर्फ बंटी पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

पदभार स्वीकारल्यानंतर बोलताना काँग्रेसचे शहराध्यक्ष नरेंद्र बनसोडे म्हणाले,काँग्रेस पक्षाच्या बाजूने नागरिकांचा कौल स्पष्ट जाणवतो आहे या शहराची जडणघडण काँग्रेस कडूनच झाली मात्र ९९ नंतर वरिष्ठ नेते शहरात येत नाहीत पवारांशी थेट सामना केला जात नाही,या भावनेने कार्यकर्ते खचत गेले आणि काँग्रेस पक्ष काही प्रमाणात कमकुवत झाला मात्र आता परिस्थिती बदलल्याने येत्या काळात सर्व वंचित उपेक्षित आणि सर्वसाधारण नागरिकांना सर्वांना सोबत घेत सर्वांची काँग्रेस करून दाखवण्याचा मानस आहे, संघटनात्मक काम करत असताना संघटन,प्रशिक्षण, प्रबोधन, आंदोलन आणि परिवर्तन या पंचसूत्रीच्या माध्यमातून काम करणार आहे, मनप-ातील प्रचंड भ्रष्टाचार यावर आंदोलन करत असतानाच मतदार यादी पुनर्परीक्षण अभियानावर अधिक भार देत जून ते ऑक्टोबर मोठे अभियान राबवणार आहे, अल्पसंख्याकांवर होत असलेल्या आक्रमण हाणून पाडण्यासाठी काँग्रेसचा कार्यकर्ता मैदानात सज्ज होणार आहे, असे बनसोडे म्हणाले.

आमदार सतेज पाटील म्हणाले पुढे अधिक बोलताना सांगितले की, राज्यात ९ लाख ३२ हजार कोटीचे कर्ज आहे प्रत्येकाच्या डोक्यावर ६० ते ८० हजार रुपये कर्ज वेगवेगळ्या पद्धतीने राज्याने निर्माण केले आहे हे सरकार राज्याचे हित पाहण्यापेक्षा स्वतःचा फायदा पहात काम करत आह.

संजय आवटे म्हणाले,आता काँग्रेसने सिव्हिल सोसायटीला सोबत घेत काम करणे महत्त्वाचे आहे,बनसोडे सारख्या युवकाला संधी मिळणे आणि त्यांच्या पदग्रहणाला बंटी पाटील सारख्या नेत्यांनी येणे ही बाब विशेष आहे, येत्या काळात पिंपरी चिंचवड शहर हे अत्यंत महत्त्वाचे असणार आहे कारण पुणे शहर पिंपरी चिंचवड शहर आणि पीएमआरडीए चा भाग मिळवून सुमारे सव्वा कोटी मतदार या ठिकाणी आहेत सर्व जात धर्म पंथाचे लोक या ठिकाणी राहतात म्हणून येत्या काळात तरुण नेतृत्व पुढे येणे गरजेचे नव्या पिढीला नवे राजकारण संविधान मूल्यावर उभा देश हवा आहे त्यांचा देश उद्या कसा असणार आहे मुळा मुठा पावना नद्या कशा असणार आहेत विकासाचे प्रारूप काय असणार आहे पुढच्या पिढीला पाणी मिळणार आहे का या प्रश्नांवर युवकांना अधिक स्वारस्य आहे विकासाचे प्रारूप यावर नवे राजकारण हे करावे लागणार आहे मेट्रो आणि मित्र म्हणजे विकास नव्हे हे या देशाला कळालेले आहे आणि म्हणून सार्वजनिक मानवट्यांवर स्वच्छ पाणी सार्वजनिक रुग्णालयांमध्ये प्रतिष्ठितांचे उपचार श्रीमंतांचे उपचार, सार्वजनिक शाळांमध्ये श्रीमंतांची मुले शिक्षण घेणे यावर सार्वजनिक विकास अवलंबून आहे तो साध्य करणे काळाची गरज आहे.याप्रसंगी मोठ्या प्रमाणामध्ये काँग्रेसचे पदाधिकारी सामान्य(**पान क्रमांक २ वर**)






## महापालिकेने सीबीएसई माध्यमिक शाळा सुरू करावी; नगरसेविका रेश्मा भुजबळ यांची मागणी



**पिंपरी:-पुनावळे परिसरातील माध्यमिक शाळेसाठी राखीव असलेली महापालिकेची जागा खासगी संस्थेला ३० वर्षांसाठी भाडेतत्त्वावर देण्याच्या प्रस्ता-वाला विरोध करत नगरसेविका रेश्मा चेतन भुजबळ यांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांना निवेदन दिले आहे.**

सदर जागेवर खासगी संस्था उभारण्याऐवजी महापालिकेने स्वतःची आधुनिक सीबीएसई माध्यमिक शाळा सुरू करावी,अशी मागणी त्यांनी केली आहे. निवेदनानुसार,पुनावळे येथील सर्व्हे क्रमांक ३८/४४, आरक्षण क्रमांक ४/५७ ही जागा माध्यमिक शाळेसाठी राखीव आहे. या जागेसाठी एका खासगी संस्थेकडून ३० वर्षांच्या भाडेकरारासाठी अर्ज करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. मात्र,पुनावळे आणि परिसर हा वेगाने विकसित होणारा निवासी भाग असून उच्च दर्जाच्या शिक्षण सुविधांची नागरिकांकडून मोठी मागणी आहे.रेश्मा भुजबळ यांनी निवेदनात म्हटले आहे की, पुनावळे परिसरात सध्या उप-लब्ध असलेल्या प्राथमिक शाळा विद्यार्थ्यांच्या वाढत्या संख्येमुळे अपुऱ्या पडत आहेत. तसेच परिसरात महापालिकेची माध्यमिक शाळा नसल्याने विद्यार्थ्यांना अन्य भागात जावे लागते. त्यामुळे नागरिकांची दीर्घकाळापासून सीबीएसई अभ्यासक्रमाच्या महापालिका शाळेची मागणी आहे. नागरिकांच्या अपेक्षा लक्षात घेता, राखीव जागा खासगी संस्थेला देण्याऐवजी त्या ठिकाणी महापालिकेने आधुनिक, सुसज्ज आणि दर्जेदार माध्यमिक शाळा सुरू करावी, अशी भूमिका त्यांनी मांडली आहे.तसेच सुरू असलेली भाडेकरार प्रक्रिया तात्काळ रद्द करून या जागेवर सीबीएसई शाळा उभारण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी त्यांनी आयुक्तांकडे केली आहे.

## नंदुशेठ लांडे यांना आदर्श चेअरमन पुरस्कार तर अण्णासाहेब मगर सहकारी बँकेचा भारत रत्न सहकारिता पुरस्काराने गौरव

पुणे-महाराष्ट्र मधील बातम्या पहा.
www.pragatbhart.com



**भोसरी:-**भारत को-ऑपरेटिव्ह बँकिंग संस्थेच्या वतीने लखनौ येथे आयोजित प्रशिक्षण शिबिरात अण्णासाहेब मगर सहकारी बँकेचे अध्यक्ष नंदुशेठ लांडे यांना आदर्श चेअरमन पुरस्कार मिळाला आहे तर बँकेस प्रतिष्ठेचा'भारत रत्न सहकारिता' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

बँकेला एकाच वेळी दोन पुरस्कार मिळाल्याने सहकार क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे.दोन पुरस्कारांचा बहुमान.उत्कृष्ट अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक पुरस्कार अण्णासाहेब मगर सहकारी बँकेला या श्रेणीत उत्कृष्ट कामगिरीबद्दल गौरवण्यात आले.त्याचबरोबर उत्कृष्ट चेअरमन पुरस्कार म्हणून बँकेचे अध्यक्ष नंदुशेठ विठोबा लांडे पाटील यांना या वर्षीचा आदर्श चेअरमन हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. सेहेचाळीस बँकांनी सहभाग घेतला होता. बी.एन.सी आणि बँकर यांच्या संयुक्त विद्यमाने भारतकूप अंतर्गत हे पुरस्कार देण्यात आले. पुरस्कार वितरण सोहळ्यात बँकेच्या पदाधिकाऱ्यांनी मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह स्वीकारले. या वेळी संचालक गणेश पवळे,संतोष भांगरे,रामदास काळजे,राजू सस्ते व बँक व्यवस्थापक माणिक येळवंडे यांनी सदर प्रशिक्षण शिबिरात सहभाग घेतला.या प्रशिक्षण शिबिरात बँकेचे पदाधिकारी सहभागी झाले होते. शिबीरार्थींना सहकार, व्यवस्थापन व बँकिंग क्षेत्रातील विविध विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले. सहकारी बँकिंग अधिक सक्षम करण्यासाठीच्या नव्या संकल्पनांवर यावेळी चर्चा झाली. सदर पुरस्कार प्राप्त होताच बँक पदाधिकाऱ्यांकडून आनंद व्यक्त करण्यात आला. हा दुहेरी सन्मान म्हणजे बँकेच्या सर्व संचालक मंडळ, कर्मचारी आणि ग्राहकांच्या विश्वासाचे फळ असल्याची भावना अध्यक्ष नंदूशेठ विठोबा लांडे पाटील यांनी व्यक्त केली.

## पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये संजय काकडे व विक्रम काकडे यांचा पक्षप्रवेश



**पुणे:-**पुण्यातील जिजाई निवास स्थानी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये संजय काकडे व विक्रम काकडे यांचा पक्षप्रवेश सोहळा पार पडला.युवा नेते तथा खासदार पार्थ अजितदादा पवार व जय अजितदादा पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश संपन्न झाला.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार,विविध पदाधिकारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.पक्षाच्या विचारधारेवर विश्वास व्यक्त करत संजय काकडे व विक्रम काकडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला.या पक्षप्रवेशामुळे पुणे शहर व जिल्ह्यात पक्ष संघटनेला अधिक बळ मिळणार असल्याचा विश्वास उपस्थित नेत्यांनी व्यक्त केला.तसेच आगामी काळात पक्ष संघटना अधिक सक्षम करण्यासाठी सर्वांनी एकजुटीने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## भारतासाठी एआय ही एक अमूल्य संधी-अदानी पावर लि.कंपनीचे मुख्य मनुष्यबळ विकास अधिकारी अमिताभ मिश्रा पीबीएस,पीसीयुचे''एचआर एक्सलन्स अवॉर्ड २०२६''संपन्न

विविध विभागाच्या ताज्या बातम्या पहा.
www.pragatbhart.com







**पिंपरी:भारतासाठी एआय ही एक अमूल्य संधी आहे. भारताकडे मोठी स्पर्धात्मक आणि मानवी भविष्य सुरक्षित करण्याची क्षमता आहे.त्याचा एचआर अधिकाऱ्यांनी योग्य समन्वय साधून उपयोग करावा,यश आ-पलेच आहे असा आत्मविश्वास अदानी पावर लि.कंपनीचे मुख्य मनुष्यबळ विकास अधिकारी अमिताभ मिश्रा यांनी व्यक्त केला.**

पुणे,बालेवाडी येथील हॉटेल ऑर्चिड येथे पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे पिंपरी चिंचवड विद्यापीठ,पुणे बिझनेस स्कूल, एचआर सक्सेस टॉक,आयस्किल बॉक्स आणि कोबज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या ''एचआर एक्सलन्स अवॉर्ड २०२६''चेआयोजन करण्यात आले होते. यावेळी मिश्रा यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी व्यासपीठावर जेष्ठ उद्योगपती पद्मश्री प्रतापराव पवार,भारत फोर्स कंपनीच्या एच.आर.उपाध्यक्ष डॉ. लीना देशपांडे,पिंपरी चिंचवडचे माजी पोलीस आयुक्त कृष्णप्रकाश, उद्योजक नरेंद्र लांडगे,पीसीईटीचे कार्यकारी संचालक डॉ.गिरीश देसाई,पीसीयूचे कुलगुरू डॉ.संतोष सोनवणे,एमइडीसी चे उपाध्यक्ष सचिन इटकर,पीसीईटी प्लेसमेंट डीन डॉ.शीतलकुमार रवंदळे,पीबीएस संचालक डॉ.गणेश राव,पीबीएस डीन डॉ.मीनाक्षी त्यागी,इंडस्ट्री इंटरॅक्शन सेल संचालक डॉ.प्रणव चरखा आणि परीक्षक,विविध गटातील पुरस्कार प्राप्त एचआर विविध कंपन्यांमधील प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी अमिताभ मिश्रा यांनी सांगितले की,एआय हे निर्णय प्रक्रिया अधिक कार्यक्षम आणि वेगवान करू शकते,परंतु मानवी संवेदनांची,विवेकाची जागा घेऊ शकत नाही.आपण स्वतः च्या कौशल्य विकासावर आणि मानवी सहयोगावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. मानवी सहभागाशिवाय कोणतेही यंत्र,एआय किंवा डिजिटल प्रणाली काम करू शकत नाही. भविष्य हे एआय ची सांगड मानवी बुद्धिमत्ता, भावनिक बुद्धिमत्ता आणि नैतिक बुद्धिमत्ता यांचा योग्य वापर आणि समन्वय साधनारांचे असेल असे मार्गदर्शन अदानी पावर लि. कंपनीचे मुख्य मनुष्यबळ विकास अधिकारी अमिताभ मिश्रा यांनी केले.

चैतन्यशील स्टार्ट अप्स परिसंस्था आणि जागतिक दर्जाची डिजिटल पायाभूत सुविधा,तरुण लोकसंख्या,संगणक,स्थानिक पुरवठा साखळी,संगणकाच्या अनेक प्रणाली,बाजारपेठ हे सर्व भारतात उपलब्ध आहे.एआय या माहितीशिवाय दुसरे काही नाही. तुम्ही ही माहिती कशी उपयोगात आणता हे महत्त्वाचे आहे. त्यामुळे आता कामाची शिकण्याची आणि नवनिर्मितीची पद्धत बदलत आहे.भारतासाठी एआय ही एक अमूल्य संधी आहे भारताकडे मोठी स्पर्धात्मक क्षमता आणि मानवी भविष्य सुरक्षित करण्याची क्षमता आहे त्याचा एचआर अधिकाऱ्यांनी योग्य समन्वय साधून काम करावे,यश आपलेच आहे असा आत्मविश्वास देखील मिश्रा यांनी यावेळी दिला.

पीसीइटीचे कार्यकारी संचालक डॉ.गिरीश देसाई यांनी सांगितले की, शिक्षण आणि उद्योग यांच्यातील दरी कमी करणे,मानव संसाधन पद्धती आणि नेतृत्वाला सन्मान करणे, व्यावसायिक आणि कॉर्पोरेट क्षेत्रातील व्यक्तींना नेटवर्किंगच्या संधी उपलब्ध करून देणे, नवोपक्रम संघटणात्मक उत्कृष्टतेला प्रोत्साहन देऊन त्यामध्ये कर्मचाऱ्यांचा सहभाग वाढवणे यासाठी अशा पद्धतीचे पुरस्कार प्रेरणादायी ठरतील असे डॉ.देसाई यांनी सांगितले.

पीसीयू कुलगुरू डॉ.संतोष सोनवणे यांनी स्वागत,प्रास्ताविक करताना सांगितले की,उद्योग परिसंस्थेतील उत्कृष्टता नाविन्यता प्रतिभा विकास आणि संस्थात्मक वाढ यांना चालना देण्यासाठी एचआर व्यावसायिक संस्था आणि उद्योगपतींनी दिलेल्या उत्कृष्ट योगदानाला मान्यता देणे आणि त्यांचा गौरव करणे या उद्देशाने पीबीएस आणि पीसीयू यांच्या वतीने एच आर एक्सलन्स अवॉर्ड्सचे आयोजन करण्यात आले.भारत फोर्स कंपनीच्या उपाध्यक्ष एचआर उपाध्यक्ष डॉ.लीना देशपांडे यांनी सांगितले की,ज्येष्ठ उद्योगपती बाबासाहेब कल्याणी यांनी म्हटल्या प्रमाणे, पुढील २० वर्षे ही शिकण्याची वर्षे असतील;त्यामुळे पीसीयू सारख्या विद्यापीठांच्या सहकार्याने कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करणे आणि त्यांना भविष्यातील अर्थव्यवस्थेसाठी व प्रगतीसाठी सज्ज करणे ही एचआरची जबाबदारी आहे. ज्ञान आणि कौशल्ये अद्ययावत ठेवणे विसरू नका;सतत शिकत राहणे हा एक निरंतर प्रवास आहे.एचआर माणसांशी संबंधित क्षेत्र आहे आणि लोकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडवून आणणे हे त्याचे मुख्य उद्दिष्ट असले पाहिजे असे डॉ. लीना देशपांडे यांनी सांगितले.पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे,उपाध्यक्ष पद्माताई भोसले,सचिव विठ्ठल काळभोर,खजिनदार शांताराम गराडे,विश्वस्त तथा पीसीयू कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे,अजिंक्य काळभोर कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी प्रतापराव पवार,कृष्ण प्रकाश, सचिन इटकर, डॉ. गणेश राव यांनी देखील मार्गदर्शन केले.निवडक पुरस्कार प्राप्त एचआर यांनी देखील मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन डॉ.मीनाक्षी त्यागी आणि आभार डॉ.प्रणव चरखा यांनी मानले.

## भाजपच्या पश्चिम महाराष्ट्र विभागीय आढावा बैठकीत रणनीती निश्चित!



**पिंपरी:**भारतीय जनता पार्टी,पश्चिम महाराष्ट्र विभागाच्या वतीने दि. ३ जून २०२६ पिंपरी-चिंचवड,पुणे उत्तर आणि मावळ जिल्हा पदाधिकाऱ्यांची अत्यंत महत्त्वाची विभागीय आढावा बैठक पार पडली.

केंद्रातील व राज्यातील भाजप सरकारचा विकास लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि आगामी संघटनात्मक कार्यक्रमांची रणनीती आखण्यासाठी या विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला भाजप महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस व विभाग समन्वयक आ. निरंजन डावखरे,प्रदेश उपाध्यक्ष व विभाग सहसंयोजक विक्रम पावसकर,विभाग सहसंयोजक विक्रम देशमुख,अभियान प्रदेश सहसंयोजक विक्रम पाचपुते आणि जिल्हा प्रभारी भरत पाटील यांची प्रमुख उपस्थिती वमार्गदर्शन लाभले.बैठकीचे स्वागताध्यक्ष पद भाजप पिंपरी-चिंचवड शहर जिल्हाध्यक्ष शत्रुघ्न (बापू)काटे आणि पुणे उत्तर (मावळ) जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद यांनी भूषवले. राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली संपूर्ण राज्यात मोदी सरकारची यशस्वी वर्षे:विश्वास,विकास आणि जनकल्याण या महाअभियानाचे आयोजन केले जात आहे.या अंतर्गत प्रदेश नेतृत्वाकडून पिंपरी-चिंचवड जिल्ह्यासाठी ४ महत्त्वाचे कार्यक्रम देण्यात आले असून, त्यांचे प्रभाग आणि मंडल पातळीवर मायक्रो-प्लॅनिंग पूर्ण झाल्याची माहिती शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी दिली. १.**पर्यावरण दिनी ऐतिहासिक पाऊल** १ लाख वृक्ष लागवड: येत्या ५जून रोजी पर्यावरण दिनाचे औचित्य साधून पिंपरी-चिंचवड शहरात एकाच दिवशी किमान १५,००० झाडे लावण्याचे काटेकोर नियोजन करण्यात आले आहे.१ लाखाहून अधिक झाडे लावून त्यांचे यशस्वी जतन व संवर्धन करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला.२.आंतरराष्ट्रीय योग दिनाचे भव्य आयोजन: २१ जून रोजी येणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिनाचे नियोजन संपूर्ण शहरात अत्यंत पद्धतशीरपणे करण्यात आले आहे. शहरातील विविध नामांकित योग संस्था, पतंजली परिवार आणि योगप्रेमींना सोबत घेऊन नागरिकांच्या सहभागातून मोठ्या प्रमाणात योग दिन साजरा केला जाईल.३.आणीबाणीचे ५१ वे वर्ष मिसाबंदींचा सत्कार:२५ जून रोजी लोकशाहीचा काळा दिवस असलेल्या आणीबाणीच्या ५१ व्या वर्षानिमित्त मंडल स्तरावर ६४.मोदी सरकारच्या योजनांचे प्रदर्शन व जनजागृती:केंद्र सरकारच्या लोककल्याणकारी योजनांचा प्रचार करण्यासाठी विविध मंडलांमध्ये भव्य प्रदर्शनी लावण्यात येणार आहे.यासोबतच शालेय विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा आणि सामान्य जनतेला मिळालेल्या लाभांच्या थेट प्रतिक्रियांचे व्हिडिओ बनवून ते लोकांपर्यंत पोहोचवले जाणार आहेत.(संघटन)नोंदणीमध्ये पिंपरी-चिंचवडचा धडाका:

या विभागीय आढावा बैठकीला आमदार महेशदादा लांडगे,आमदार शंकरशेठ जगताप,खासदार अमरजी साबळे, .खासदार रणजीत सिंह निंबाळकर,मा.आमदार श्रीमती अश्विनीताई जगताप,सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे,स्थायी समिती अध्यक्ष अभिषेक बारण,सदाशिवखाडे,सरचिटणीस वैशालीताई खाडये, सरचिटणीस विकास डोळस,पश्चिम महाराष्ट्र आणि मावळ परिसरातील सर्व प्रमुख पदाधिकारी,आजी-माजी लोकप्रतिनिधी,मंडल अध्यक्ष,विविध आघाड्यांचे जिल्हा संयोजक,सर्व आघाड्यांचे प्रमुख आणि भाजपचे सक्रिय कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.आढावा बैठकीचे सूत्रसंचालन योगेशजी बाचलं यांनी केले तर भारतीय जनता पार्टी जिल्हा महामंत्री श्री मधुकर बच्चे यांनी आभार मानले .राष्ट्रगीताने आढावा बैठकीची सांगता झाली.